**परित्यक्ता व निराधार स्त्रियांना तात्पुरत्या स्वरुपात**
**बी.पी.एल.च्या पिवळया शिधापत्रिका देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : साविव्य-१००८/प्र.क्र.६०४/नापु-२८
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १८ फेब्रुवारी, २००९

पहा :- (१) शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक : साविव्य १०९९/ प्र.क्र.८८८६/नापु-२८, दिनांक ५ नोव्हेंबर, १९९९.
(२) शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक : साविव्य १०००/ प्र.क्र.४००/नापु-२८, दिनांक ८ नोव्हेंबर, २०००
(३) शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक : साविव्य १००१/ प्र.क्र.४८३/नापु-२८, दिनांक ८ ऑगस्ट, २००१
(४) शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक : साविव्य १००१/ प्र.क्र.६०४/नापु-२८, दिनांक २९ सप्टेंबर, २००८.

## -: प्रस्तावना :-

राज्यात दिनांक १ जून, १९९७ पासून लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरु झाली असून या व्यवस्थेअंतर्गत तीन रंगांच्या शिधापत्रिका देण्यात येतात. या योजनेअंतर्गतच्या धान्याचे लाभ मिळण्यासाठी पात्रतेचे निकष शासन निर्णय, दिनांक ५ नोव्हेंबर, १९९९ व दिनांक ८ ऑगस्ट, २००१ अन्वये विहित केले आहेत. त्या अनुषंगाने दारिद्रयरेषेखालील कुटुंबांकरीता पिवळया शिधापत्रिका देण्यात येतात.

२. परित्यक्ता व निराधार स्त्रियांना दारिद्रयरेषेखालील पिवळया शिधापत्रिकेचा लाभ देण्याबाबतची मागणी शासनाकडे वारंवार होत होती. या मागणीच्या अनुषंगाने परित्यक्ता व निराधार स्त्रियांना बी.पी.एल.च्या पिवळया शिधापत्रिका तात्पुरत्या स्वरुपात देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार दि. २९ सप्टेंबर, २००८ अन्वये परित्यक्ता व निराधार महिलांना तात्पुरत्या स्वरुपात दारिद्रयरेषेखालील बीपीएलच्या पिवळया शिधापत्रिका देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने त्यात काही सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

## -: शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार परित्यक्ता व निराधार स्त्रियांचे नांव दारिद्रयरेषेखालील यादीत नसले तरी व त्यांचेकडे स्वयंपाकाचा गॅस व दुचाकी वाहन असले तरी त्यांना बी.पी.एल.च्या पिवळया शिधापत्रिकेचे लाभ **तात्पुरत्या स्वरुपात** देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. शासन निर्णय दिनांक २९

सप्टेंबर, २००८ ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने त्यामधील (अ) ते (ह) खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-

[अ] नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई व संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी परित्यक्ता व निराधार स्त्रियांकडून नमुना नं. १ या अर्जात बी.पी.एल.च्या शिधापत्रिका देण्यासाठी त्यांच्या कुटुंबांची माहिती भरून घेण्यात यावी व प्राप्त माहितीची उचित छाननी करुन त्यांना बी.पी.एल. ची तात्पुरती पिवळी शिधापत्रिका देण्यात यावी.

[ब] त्या अर्जाची तपासणी करून या स्त्रियांना बी.पी.एल.च्या पिवळया शिधापत्रिकांचे लाभ तात्पुरत्या स्वरूपात देण्यात यावेत. याव्यतिरिक्त, यापूर्वी निर्गमित केलेल्या संदर्भीय शासन निर्णयानुसार विहित केलेल्या उर्वरित निकषामध्ये कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत.

[क] हे लाभ तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येणार असल्यामुळे अशा कुटुंबांच्या सध्याच्या शिधापत्रिकेवरच बी.पी.एल चे तात्पुरते लाभार्थी असा शिक्का मारुन हे लाभ देण्यात यावेत.

[ड] राज्यात शिल्लक राहणाऱ्या बी.पी.एल. च्या धान्याच्या नियतनातूनच परित्यक्ता व निराधार स्त्रियांना बी.पी.एल. चे धान्य उपलब्ध करुन देण्यांत येईल.

[इ ] हे लाभ त्यांना केन्द्र शासनाकडून मिळणा-या धान्याच्या नियमित उपलब्धतेच्या मर्यादेतच व उपलब्धतेच्या अधिन राहून देण्यात येत आहेत.

[फ] सदर लाभ केवळ तात्पुरत्या स्वरुपात द्यावयाचे असल्यामुळे भविष्यात बी.पी.एल. धान्याचा खप वाढल्यास हे लाभ तात्काळ बंद करण्यांत येतील.

[ग] सदर परिच्छेद वगळण्यात येत आहे.

[ह] तसेच, भविष्यात बीपीएलच्या धान्याचा खप वाढून मूळ लाभार्थ्यांना धान्य कमी पडू लागले तर या अतिरिक्त लाभार्थ्याचे लाभ काढून घेण्यात येतील, याबाबत या शासन निर्णयानुसार पात्र ठरणाऱ्या सर्व लाभार्थ्यांकडून सोबतच्या प्रपत्राप्रमाणे लेखी स्वरुपात सहमतीपत्र घ्यावे.

३. सदरचा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिला असून त्याचा सांकेतांक असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

***(ए. का. गागरे)***
कार्यासन अधिकारी,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त
सर्व उप आयुक्त (पुरवठा)
सर्व जिल्हाधिकारी / सर्व अपर जिल्हाधिकारी
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.
पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातील सर्व अधिकारी / कार्यासने

वित्तीय सल्लागार व उप सचिव (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग)
सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी / सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
खाजगी सचिव, मा.मंत्री (अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे कार्यालय
खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री (अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे कार्यालय
प्रधान सचिव (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) यांचे स्वीय सहाय्यक
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
कार्यासन नापु-२८ ची निवड नस्ती

## <u>प्रपत्र</u>

(शासन निर्णय अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक : साविव्य-१००८/ प्र.क्र.६०४/ नापु-२८, दिनांक : २९ सप्टेंबर, २००८ चे सहपत्र)

शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक : साविव्य-१००८/प्र.क्र.६०४/नापु-२८, दिनांक : २९ सप्टेंबर, २००८ अन्वये माझ्या कुटुंबास देण्यात आलेले बीपीएल दराने धान्य मिळण्याबाबतचे लाभ तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आले असल्याची स्पष्ट जाणीव मला देण्यात आली असून मी पुनर्विवाह केल्यास बी.पी.एल. ची शिधापत्रिका व त्यावर मिळणाऱ्या लाभास मी पात्र राहणार नाही. तसेच भविष्यात शासनामार्फत या निर्णयाबाबत काहीही आदेश निर्गमित झाल्यास त्यातील तरतूदीस अधिन राहून माझ्या कुटुंबाचे बीपीएल दराने धान्य मिळण्याचे लाभ खंडित करण्यात येतील याची मला जाणीव करून देण्यात आली आहे.

दिनांक : ( कुटुंब प्रमुखाचे नाव व स्वाक्षरी )

*****